
ISSN-2350-0395

# SHODHPARV
# शोधपर्व

VOLUME - II | SPECIAL ISSUE-I | DECEMBER - 2015

## INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND SOCIAL SCIENCES





## NATIONAL LEVEL SEMINAR ON NEED OF NEW REFORMS IN AGRICULTURE SECTOR

Organised By
DEPARTMENT OF ECONOMICS
M.V.P. Samaj's
G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar, Dist. Nashik - 422 103
Ph.: 02551 - 220099 Web : www.sinnarcollege.in email : sinnarcollege001@yahoo.com
NAAC Re-Accredited B (CGPA=2.82)

| | | | |
|---|---|---|---|
| 59 | भूगी सुधारणा आणि देशाचा आर्थिक विकास | प्रा. रावसाहेब भिका मैराळे प्रा. रुपाली आनंदगिरी गोसावी | 274 |
| 60 | भारतीय कृषी क्षेत्रात नविन धोरणात्मक सूधारणांची गरज | डॉ. बी.डी. खेडकर प्रा.श्रीमती पाटील साधना वाल्मिक | 278 |
| 61 | कृषी क्षेत्रात नवीन उद्योजकीय सुधारणांची गरज | डॉ. बी.डी.खेडकर प्रा.जे.के.साळी | 282 |
| 62 | कृषीक्षेत्र व सहकारी पतसंस्था समोरील आव्हाने | प्रा. संध्या पुंडलिकराव सोनकांबळे | 285 |
| 63 | कृषी विकासातील नवे पर्याय व तंत्रज्ञान | प्रा. डॉ. बी.डी. खेडकर क्षीरसागर वैशाली एस. | 289 |
| 64 | कृषी विपणनातील नविन सुधारणांची गरज | प्रा. डी. डी. गव्हाणे | 292 |
| 65 | स्ट्रॉबेरी उत्पादनाचे नवे तंत्रज्ञान | श्री. यशवंत चौधरी | 295 |
| 66 | शेतीत स्थिर व शाश्वत गुंतवणूकीसाठी ग्रामीण पतपुरवठयाचे पुनर्संघटन करणे आवश्यक आहे | प्रां.व्ही.एन शेळके | 299 |

ISSN-2350-0395 Volume-II, Special Issue-I (December-2015)

# शेतीत स्थिर व शाश्वत गुंतवणूकीसाठी ग्रामीण पतपुरवठ्याचे पुनर्संघटन करणे आवश्यक आहे

प्रा.व्ही.एन शेळके
अर्थशास्त्र विभागप्रमुख
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर,मिग

1991 पासुन भारत सरकारच्या आर्थिक धोरणात झालेला बदल हा मुख्यत्वे करून उद्योग विदेश व्यापार व चलन,वित्त संस्था व अर्थसंकल्पिय धोरण या क्षेत्रात झालेले आहे.शेतकी व ग्रामिण अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रातील बदल तुलणेने कमी झालेले आहेत.ग्रामीण वित्तसंस्थांवरील रिझर्व्ह बँकेची नियंत्रणे कमी झालेली आहेत.मात्र केंद्र व राज्यसरकारांची शेतीविषयक धोरणे फारशी बदललेली नाहीत.

सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र म्हणजेच स्वतः शेतकरी यांच्या संमिश्र भुमिकेवर आधारित असे शेतीतील गुंतवणूक धोरण आहे.मोठया,मध्यम व लहान पाटबंधारे योजनेत व ग्रामीण विद्युतीकरणात सरकार हेच एकमेव गुंतवणूकदार राहीलेले आहेत.मात्र नदी नाल्यातुन व भूतलातून उपसा जलसिंचनात गुंतवणूक करणे काही राज्ये वगळता शेतकऱ्यांवरच सोडण्यात आली आहे.भूविकास आणि ट्रक्टर व अन्य शेतकी अवजारातील गुंतवणूकीचा बराचसा हिस्सा सहकारी व सरकारी बँकानी दिलेल्या सवलतींच्या व्याजावरील कर्जातून आलेला आहे.पाटबंधारे सिंचनाचा व पंपासाठीच्या विजेचा खर्च इतक्या मोठयाप्रमाणात अनुदाणीत आहे की त्या पटट्ीतुन या योजनांचा चालु खर्च ही भरून निघत नाही. शेतकऱ्यांची खत खरेदी सुद्धा फारच अनुदाणीत आहेत.

आतापर्यत तृणधान्ये,कडधान्ये,तेलबिया,उस,कापूस व ताग यांच्या आधारभूत किमती सरकार जाहीर करत आलेले आहे.किमतींना आधार देण्याचे काम भारतीय अन्न महामंडळाकडून फक्त मोठया उत्पादक केंद्रातच होत आहेत.इतरत्र परिणामकारक आधार नाही. ऊस,कापूस,ताग यांच्या आधार किंमती त्या त्या महामंडळाकडून निर्धारीत केल्या जातात परंतु सर्व प्रकारच्या कृषी उत्पादनाच्या आधार किंमती उत्पादन खर्चाच्या आधारावर निर्धारीत करणे व्यवहारीकदृष्टया ही अशक्य आहे.बऱ्याच राज्यात कृषिउत्पादनाच्या नियमित बाजारपेठाही नाहीत.ग्रामीण भागातील रस्ते अतिशय दयनिय अवस्थेत आहेत. दुरध्वनी सेवा बऱ्याच खेडयात पोहचली आहे पण त्याचा उपयोग शेतीविषयक माहितीच्या देवाण--घेवाणीपेक्षा अन्य कामासाठीच जास्त केला जातो.

सहकारी संस्था तर अध्यापही सरकारच्या भक्कम नियंत्रणाखालीच आहेत.आणि पुष्कळशा अडचणीत आहेत.सहकारी साखर कारखाने तर ऑक्सिजनवर आहेत.सहकारी पतसंस्था आणि मध्यवर्ती सहकारी बँका केवळ राजकारण्यांच्या दावणीला बांधलेल्या आहेत.त्यांचे थकबाकीचे प्रमाण चिंतनिय आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेच्या बचतीचा बराच भाग बिगर सहकारी संस्थांमध्ये गुंतलेला आहे.

अशा प्रकारे सरकारच्या ग्रामीण व शेतकी विकासाच्या अनुषंगाने पुढील बदल अपेक्षीत आहेत.

**भांडवल गुंतवणूक :–**

शेतीत गुंतवणूकीसाठीचा 80 ते 85: निधी वित्तसंस्थांकडून येतो पिक कर्जासाठी सहकारी व व्यापारी बँका शक्य तेवढया जास्त प्रमाणात नाबार्डवर अवलंबून राहतात.शेतीतील कच्चा मालाचा पूरवठा करणाऱ्या किंवा उत्पादित मालावर प्रकिया करणाऱ्या व्यापाऱ्यांना व कारखानदारांना त्या स्वता:च्या निधी उसना देणे जास्त फायदेशीर समजतात.दुसरे म्हणजे सधन शेतकऱ्यांच्या हातातील रोख बचत ते बिगर शेती उद्योगात गुंतवली जाते.म्हणुनच शेतीतील भांडवल गुंतवणुकीचा जरूरीपेक्षा जास्त भाग नाबार्ड सारख्या बाहय संस्थेकडून येत असतो.हा प्रकार फारकाळ चालत रहाणे योग्य नाही.सहकारीसंस्था

बॅंकांबाहेरील निधिवर मुदत कर्जे व पिक कर्जे यासाठी अवलंबून राहतात कारण त्यांचे स्वतःचे निधी अपुरे आहेत.रिझर्व्ह बॅंकेने देण्याचे व घेण्याचे व्याजदर ठरविले प्रकिया उद्योगाकडून जास्त व्याज मिळत असल्याने बॅंकांना त्यांना कर्जपूरवठा करणे आणि शेतकऱ्यांना बारा टक्क्याने कर्ज देण्यात नाबार्डवर अवलंबुन राहणे आकर्षक वाटते.शेतकरी सहकारी बॅंकेत ठेवी ठेवण्यास उत्सुक नसतात पण कर्ज घेण्यास उत्सुक असतात.याचा परीणाम शेतकरी व शेती व्यवसायास हानीकारक ठरत आहेत.संस्थांनी शेतकऱ्यांना दिलेला पैसा सभासदांचा नसल्याने वाटपावर व परतफेडीवर योग्य देखरेख राहीलेली नाही. त्यामुळे दुरूपयोग व थकबाकी हे अटळ परिणाम झाले.स्वस्त भांडवलामुळे काळजीपुर्वक व किफायतशीर गुंतवणूक न होता अपव्यय व थकबाकी वाढली.यातून कर्जमाफीची मागणी वाढली.जिने ग्रामीण वित्त संस्थांचा विनाश केला आहे.शेतीला देण्याच्या कर्जावरील व्याजदर बॅंकदरापेक्षा कमी ठेवलेले आहेत. व्याजदरावरील नियंत्रनापासून सहकारी संस्थांना आणि बॅंकानासुद्धा मुक्त ठेवले पाहीजे.त्या आपल्या सभासदांकडून अधिक व्याज वसूल करू शकतील,सभासदांच्या ठेवी इतरांना पतपुरवठा म्हणुन दिल्या जातील.त्यामुळे साहजीकच कर्जाच्या अर्जाची काळजीपुर्वक छाननी व परतफेडीवर पध्दतशीर देखरेख ठेवली जाईल.प्रत्येक सोसायटीने किंवा बॅंकेने आपापले व्याजदर ठरवावे.लादलेल्या एकसारखेपणाला काहिही अर्थ राहत नाही.अशा परीस्थीतीत बाह्यकर्जापेक्षा शेतकरी स्वतःच आपल्या गुंतवणूकींना वित्तपुरवठा करणे पसंद करतील.बाह्यकर्जे किमान आवश्यक तेवढेच घेतले जातील आणि उपाययोजना काळजीपुर्वक व किफायतशिरपणे केली जाईल.केरळ मधील प्राथमिक पतसंस्थांनी हे दाखवून दिलेले आहे.त्यांच्या दोनतृतियांश पेक्षा जास्त उचली या त्यांच्या स्वतःच्या ठेविंमधुन होतात व अठ्ठयांणव टक्के परतफेडीचे प्रमाण आहे.नाबार्डच्या स्वस्त व्याजी पुनर्वित्त पुरवठयाखालील पिक कर्जातच परतफेडीचे अपयश दिसते. व्यापारी बॅंकांनी आर्थिकदृष्टया किफायतशीर बनावे व शंकास्पद कर्जांना बूडित कर्ज म्हणून जाहीर करावे.या रिझर्व्ह बॅंकेच्या आग्रहामुळे शेतीतील हलगर्जी कर्ज वाटपाला पायबंद बसेल. नाबार्डलाही कमी व्याजदराने पुनर्वाटपासाठी पैसा मिळवत रहावा लागणार नाही ग्रामीण पतपुरवठयाचे भक्कम पायावर पुनर्संघटन करण्यानेच शेतीत स्थिर आणि शाश्वत गुंतवणूक होणार आहे.

शेतीतील सार्वजनीक गुंतवणूकीपेकी नव्वद टक्कयांपेक्षा जास्त गुंतवणूकीसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजही फिटत नाही, म्हणून पाणीपट्टीचे दर लाभाच्या प्रमाणात असले पाहिजे त्याशिवाय पाण्याचे किफायतशीर विवेकपूर्ण वापर होणार नाही, पाटबंधारे योजनेला योग्य वित्तपुरवठा व त्याचे चांगले व्यवस्थापन होण्यासाठी सिंचनाच्या मालकीचे व व्यवस्थापनाचे विकेंद्रिकरण व्हावे लागेल. उपवाहिकेच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी संस्था काढून किंवा कंपनी काढून सरकारने व्यवस्था त्यांच्याकडे सोपवावी.सरकारने त्यांना मुख्यकालव्यातून घनफुटाच्या हिशेबाने पाणी विकत दिले पाहिजे व पाटकऱ्यांमार्फत सभासदांना पाण्याचे वाटप करावे त्यामूळे पाण्याचा अपव्यय होणार नाही व जलसिंचन क्षमताही वाढेल.नव्याने हातात घ्यावयाच्या सिंचन योचनातही हाच मार्ग अवलंबला पाहिजे.

## संदर्भ


१. Indian Economy Datt & Sundaram
२. भारतीय अर्थव्यवसस्था देसाई–भालेराव
३. भारतीय अर्थकारणाच्या बदलत्या दिशा संपादक मंडळ पुणे